# कर्मवीर शंकरराव काळे सह.साखर कारखाना लि.गौतमनगर
# पो.कोळपेवाडी ता.कोपरगाव जि.अहमदनगर

जा.क्र./ऊस विकास/ २२८६ दि. ५/११/२०२०

## - परिपत्रक -

## लागवड हंगाम २०२०-२१ (गळीत हंगाम २०२१-२२) करीता
## 'पुर्व हंगामी,सुरु ऊस लागवड व खोडवा व्यवस्थापन धोरण'

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व 'क' वर्ग सभासदांना कळविण्यात येते की, कारखान्याचे लागवड हंगाम २०२०-२१ (गाळप हंगाम २०२१-२२) करीता कारखाना कार्यक्षेत्रात ऊसाची उपलब्धता व्हावी या हेतूने ऊस उत्पादकांनी पुर्व हंगामी,सुरु ऊस लागवडी कराव्यात व तुटलेल्या ऊसाचे खोडवे/निडवे राखावे त्यासाठी कारखान्याच्या मा. संचालक मंडळाने खालीलप्रमाणे धोरण घेतलेले आहे.

**१)ऊस लागवड कालावधी व ऊस जाती-**

| अ.नं | पिक प्रकार | हंगाम कालावधी | शिफारशीत ऊस जाती |
|---|---|---|---|
| १ | पुर्व हंगामी | १ ऑक्टोबर ते ३०नोव्हेंबर २०२० | को८६०३२,कोएम-०२६५,एमएस-१०००१, कोव्हीएसआय-०३१०२,व्हीएसआय-०८००५ |
| २ | सुरु | १ डिसेंबर ते ३० एप्रिल २०२१ | को८६०३२,कोएम-०२६५,एमएस-१०००१, कोव्हीएसआय-०३१०२,व्हीएसआय-०८००५ |
| ३ | खोडवा | गळीत हंगाम २०२०-२१ मध्ये तुटलेले सर्व ऊस पिकाचे खोडवे /निडवे | |

**२) ऊस बेणे-** कारखाना हमीवर प्रती एकरी रू.७,०००/- रक्कमेपर्यतचे ऊस बेणे उधारीने उपलब्ध करून देण्यात येईल.ऊस बेण्याचा खरेदी विक्री दर सभासदांनी आपआपसात ठरवावयाचा आहे.परंतू कारखान्याची बेणे विक्री चिठ्ठी असल्याशिवाय परस्पर बेणे विक्री करू नये.

**३) ऊस रोपापासून ऊस लागवड योजना-**

**अ)** जे शेतकरी ऊस रोपे विकत घेऊन ऊस लागवड करतील त्यांना कारखान्याने नियुक्त केलेल्या नर्सरीज मधुन ऊस रोपे उधारीने उपलब्ध करुन दिले जातील. त्याकरीता ऊस रोपे बुकींग करते वेळी प्रती रोप ०.५०/-रु (पन्नास पैसे) या प्रमाणे आगाऊ रक्कम शेतक-यास कारखान्याकडे जमा करावी लागेल.

**ब)** कारखान्यामार्फत शेतकरी सहभाग (डिपॉझीट) व अधिक प्रती एकरी रु.७,०००/-पर्यंत बेणे मर्यादा रक्कम शेतक-याच्या मागणीनुसार ऊस रोपे खरेदी कामी सदर नर्सरी कडे परस्पर जमा केली जाईल व सदरची डिपॉझीट रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम रोपे खरेदीदार शेतकऱ्यांचे नावे टाकुन गळीतास येणा-या ऊस बिलातुन व्याजासह वसुल करण्यात येईल.

**क)** कारखान्याने प्रती एकर ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा ऊस रोपे खरेदी कामी देऊ केलेल्या ॲडव्हांस(उचल) वजा जाता जास्तीची होणारी रोपे खरेदीची रक्कम शेतक-याने परस्पर संबंधित नर्सरीस अदा करावी लागेल. तसेच बुकिंग नंतर रोपे ३० ते ४० दिवसात उपलब्ध करुन दिले जातील.

**४) रासायनिक खते-** पुर्व हंगामी,सुरु ऊस लागवड व खोडवा पिकास प्रती एकरी २ गोणी युरीया व २ गोणी इफको १०:२६:२६ अथवा तत्सम खते रू.३०००/- रक्कमेपर्यत उधारीने उपलब्धतेनुसार पुरविण्यात येतील.

**५) ठिबक सिंचना खालील ऊस पिकास विद्राव्य खतांचा उधारीने पुरवठा :-**ठिबक सिंचन संच बसवुन जे ऊस उत्पादक ऊस पिक जोपासतील त्यांना इफको (१७:४४:००) व इफको (१८:१८:१८) किंवा तत्सम विद्राव्य खते प्रत्येकी प्रति एकरी २५ किलो उधारीने देण्यात येईल.परंतु ज्यांनी रासायनिक खते घेतली असतील त्यांना विद्राव्य खते दिली जाणार नाही.

मागील पानावर/-

६) **गंधक-** दुय्यम अन्नद्रव्य म्हणून गंधक (सल्फर) एकरी १० किलो या प्रमाणात उधारीने उपलब्धतेनुसार पुरविण्यात येईल.

७) **तणनाशके-** ऊस पिकातील तण नियत्रणांकरीता कारखान्यामार्फत मेट्रीब्युझीन ७०% WP चा उपलब्धतेनुसार उधारीने पुरवठा करण्यात येईल.

८) **सुक्ष्मअन्नद्रव्ये, द्रवरूप जैविक खते(व्ही.एस.आय निर्मित )-** ज्या ऊस उत्पादकाना ऊस पिकावर सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते (मल्टीमायक्रोन्युट्रीयंट) व द्रवरुप जैविक खते,पोषके व जैविक किटकनाशके यांची फवारणी करावयाची आहे. त्यांना कारखाना धोरणाप्रमाणे रोखीने उपलब्ध करुन देण्यात येईल

९) **पाचट कुट्टी/बुडखा छाटणी करीता अर्थसहाय्य -** खोडवा पिकामध्ये पाचटाचे अच्छादन केल्यास पाण्याचे पाळ्यामध्ये दुपटीने अंतर वाढते पाचट कुजल्याने जमिनीत जीवाणुची संख्या वाढुन सेंद्रीय कर्बाची वाढ होऊन काही प्रमाणात तणांचे नियंत्रण होते. पुर्वीचे ऊस पिक हे वरून तुटले गेले असल्यास त्याचा खोडवा चांगल्या पध्दतीने फुटत नाही जर खोडवा पिकामध्ये बुडखा छाटणी जमिनीलगत केल्यास त्याचा खोडवा एकसारखा व जोमदार फुटतो त्याकरीता जे शेतकरी खोडवा पिकात पाचट कुट्टी व बुडखा छाटणी करतील त्या क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांना प्रती एकरी रू.१५००/ॲडव्हांस (उचल) देण्यात येईल.त्याची विगतवारी पुढील प्रमाणे राहील (पाचट कुट्टी रु.७५०/- व बुडखा छाटणी रु.७५०/- )

१०) **ठिबक जलसिंचन योजना-**

| ठिबक सिंचन | ठिबक जलसिचंन योजनेसाठी आय.एस.आय.ठिबक संचास रु.१००००/- किंवा नॉन आय.एस.आय.ठिंबक संचास रु.७०००/- प्रती एकरी एक रक्कमी ॲडव्हांस प्रचलित व्याजदराने (१२.५%) देण्यात येईल. |
|---|---|
| देय ॲडव्हांस साठी ठिबक संच खरेदीचे बिल,७/१२ उतारा ,२ ऊस उत्पादक सभासद जामिनदार व फिल्डस्टापचा पाहणी अहवाल ऑफीसला सादर झालेनंतर रक्कम अदा केली जाईल. ऊस गळीतास न आल्यास एकत्रित कुटुंबातील सदस्यच्या किंवा जामिनदाराच्या ऊस बिलातुन ॲडव्हांसची रक्कम व्याजासह वसुल केली जाईल. | |

११) रासायनिक खते, तणनाशके , इत्यादी वस्तुरूप सहाय्याची त्याचप्रमाणे बेणे ॲडव्हांस, बुडखा छाटणी, पाचटकुट्टी व ठिबक संच खरेदीकामी ॲडव्हांस रक्कमेची वसुली ही कारखान्याचे प्रचलित धोरणाप्रमाणे सव्याज (१२.५%)ऊस उत्पादकांचे ऊस बिलातून करण्यात येईल.

१२) पुर्व हंगामी,सुरु व खोडवा पिकाची कारखान्याकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.याशिवाय एकत्रित कुटुंबातील संपुर्ण ऊस क्षेत्राची नोंद कारखान्याकडे करणे आवश्यक राहील. अर्थसहाय्य व वस्तुरूप सहाय्य हे संबधीत शेतक-याकडे पुर्वी असलेली कारखाना येणे बाकी विचारात घेऊन देण्यात येईल.

१३) वरील नियम व अटी हया प्राथमिक स्वरुपाच्या असुन त्यामध्ये वाढ अथवा सुधारणा करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखुन ठेवलेला आहे.

**कारखान्यामार्फत वस्तुरूप सहाय्य इ.घेतेवेळी आधारकार्ड व ओळखपत्र/अधिकारपत्र दाखविणे आवश्यक राहील.**

तरी सर्व ऊस उत्पादकांना विनंती करण्यात येते की,गळीत हंगाम २०२१-२२ चे गळीतासाठी जास्तीत जास्त पुर्व हंगामी ,सुरु ऊस लागवडी कराव्यात व खोडवे/निडवे ठेवून कार्यक्षेत्रातून ऊस उपलब्धता वाढविण्याकरीता सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु
गि.ज.जगताप
कार्यकारी संचालक